| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | ०४.०८.२०२२ |
| नोंदणी तारीख | ०४.०८.२०२२ |
| निकाल तारीख | २७.०३.२०२६ |
| कालावधी | **०३ वर्षे, ०७ महिने, २३ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]

| | |
|---|---|
| **निशाणी – ११ खाली** | |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,**<br>**पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. ०८/२०२२ अहेरी पोलीस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | २७.०३.२०२६ |
| प्रकरण क्रमांक | **सं. फौजदारी खटला क्रमांक ३६१/२०२२** |
| | **CNR** –MHGA070007232022 |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**,<br>मार्फत/पोलीस स्टेशन अधिकारी, अहेरी,<br>(फिर्यादी काशिनाथ सडमाके पो.हवा.) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता आर.एस. उंदिरवाडे** |
| आरोपी | **नागेश लचमा आत्राम,**<br>वय अंदाजे ४२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार– लगाम, तहसिल–मुलचेरा,<br>जिल्हा–गडचिरोली |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | आरोपी करीता श्री. सतीश जैनवार,<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०४.०१.२०२२ |
| पहिल्या खबरीची तारीख | ०४.०१.२०२२ |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

| | |
|---|---|
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०१.०८.२०२२ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | ०४.०८.२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १५.१०.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | २७.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २७.०३.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

## आरोपीबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नागेश लचमा आत्राम, | -- | ०४.०८.२०२२ | महाराष्ट्र दारु प्रतिबंध अधिनियम, १९४९ च्या कलम ६५(ई), प्रमाणे दंडनिय | **निर्दोष** | – | – |

| **या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ | **दारुबंदी अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | शंकर उत्तमराव दहिफळे (**निशाणी ११ खाली**) | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| सा.क्र. २ | काशिनाथ धोंडुजी सडमाके (**निशाणी ११ खाली**) | फिर्यादी |
| सा.क्र. ३ | हेमराज गरीबजी वाघाडे (**निशाणी ११ खाली**) | तपासी |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–१४**/स.सा.क्र.०२ | खबर |
| २. | निशाणी **पी–१५**/स.सा.क्र.०२ | छापिल नमुन्यातील खबर |
| ३. | निशाणी **पी–१६**/स.सा.क्र.०२ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | निशाणी **पी–१७**/स.सा.क्र.०२ | मालमत्ता शोध व जप्ती पंचनामा |
| ५. | निशाणी **पी–१८**/स.सा.क्र.०२ | सि.ए. फार्म |
| ६. | निशाणी **पी–१९**/स.सा.क्र.०३ | सि.ए. अहवाल |

**ड. महत्त्वाच्या वस्तु :**

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ०३/२०२२<br>दि.०४.०१.२०२२ | ३० लिटर हातभटटी गुळा मोहाची दारू |

## न्यायनिर्णय

(दिनांकः २७ मार्च २०२६)

१. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दिनांक ०४/०१/२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० ते ०५.३० वाजताचे दरम्यान मौजा–लगाम, तालुका–मुलचेरा, जिल्हा गडचिरोली येथे आरोपी त्याच्या घरी दोन पांढ–या रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये ३० लिटर हातभट्टी गुळामोहाची दारू बेकायदेशिरपणे विनापरवाना बाळगताना मिळुन आला. आरोपीचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष

कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आरोपीविरुध्द पुरावा असल्याने तिची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र.११ खाली नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक ०४/०१/२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० ते ०५.३० वाजताचे दरम्यान मौजा–लगाम, तालुका–मुलचेरा, जिल्हा गडचिरोली येथे आरोपी त्याच्या घरी दोन पांढ–या रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये ३० लिटर हातभट्टी गुळामोहाची दारू बेकायदेशिरपणे विनापरवाना बाळगताना मिळुन आल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २ | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ करिताः

२. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने केवळ तीन साक्षीदार तपासले.

३. सा.क्र.२ **काशिनाथ धोंडुजी सडमाके** (फिर्यादी) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.०४.०१.२०२२ रोजी अहेरी पोलीस ठाण्यात कार्यरत असतांना आरोपी दारू विक्री करीत असल्याबाबत माहिती मिळाली. त्यानंर आरोपीच्या घरी छापा टाकला असता आरोपीच्या ताब्यात प्लास्टीक कॅनमध्ये ३० लिटर हातभट्टी गुळामोहाची दारूमिळुन आली. त्यांनी मौकयावर घटनास्थळ पंचनामा तयार केला व मुददेमालापैकी १८० मी.ली. दारू. सि.ए. करीता सिलबंदल केली व त्यानंतर पोलिस स्टेशन येवुन घटनेसंबंधी फिर्याद नि.क्र.१४ दिली. आरोपीतर्फे उलटतपासात विचारलेल्या सर्व सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

४. सा.क्र.१ **शंकर उत्तमराव दहिफळे** (साक्षीदार) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि. ०४/०१/२०२२ रोजी ते पो.स्टे. अहेरी येथे कार्यरत असतांना त्यांना मुखबिराकडून मौजा लगाम येथे आरोपी दारु बाळगून विक्री करीत असल्याची माहिती मिळाल्याने तो व इतर पोलीस कर्मचारी पंचांसह तिथे गेले. तेथे आरोपीच्या ताब्यात ३० लिटर गुळामोहाची दारु असा दारूसाठा मिळाला होता. त्यांनी तो जप्त केला होता व कागदी सिल लावून सिलबंद केला. त्यानंतर त्याबाबत पो.हवा. श्री. काशिनाथ सडमेक यांनी कावाई केली व पोलीस ठाण्यात आल्यानंत खबर दिली होती. तपासी अधिकारी यांनी त्यांचे जबाब घेतले होते. आरोपीतर्फे उलटतपासात विचारलेल्या सर्व सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

५. सा.क्र.३ **हेमराज गरीबजी वाघाडे** (तपासी अधिकारी) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, ते आरोपीला ओळखत असुन दि.०४.१.२०२२ रोजी अहेरी पोलीस ठाण्यात कार्यरत असतांना त्यांनी या गुन्ह्यामध्ये तपासी अंमलदार म्हणुन काम केले होते. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, त्यांच्या बयानावरून सिध्द झाले की, आरोपीने गुन्हा केला आहे. सी.ए. अहवाल मिळाल्यानंत अभिलेखासोबत दाखल केले व तपासाअंती त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांना विचारलेल्या सर्व प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

६. दोन्ही पक्षांतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच दस्तऐवज व पुराव्याचे अवलोकन केले.

७. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात अभियोग पक्षाने केवळ तीन साक्षीदार तपासले व सर्व साक्षीदार हे पोलिस साक्षीदार आहे. सदर प्रकरणात पंच साक्षीदार तसेच मुददेमाल वाहक यांची साक्ष नोंदविण्यास आली नाही तसेच जप्त केलेले द्रव्य दारु असल्याबाबतचा दर्शविणारा निर्णायक पुरावा म्हणून रासायनिक पृथःकरण अहवाल अभियोगपक्षाने न्यायालयासमोर सादर केला. परंतु, आरोपीविरुध्द सबळ व सुसंगत पुरावा नसल्यामुळे तसेच अभियोगपक्ष आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा संशयाचे पलिकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होवू शकत

नाही. सबब, आरोपी ही सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी येतो. म्हणून मी मुद्दा क्र.१ ला नकारार्थी उत्तर देतो.

**मुद्दा क्र.२ करिताः**

८. वर चर्चा केल्याप्रमाणे आणि अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द न केल्याने सदर गुन्हयातून त्यांना निर्दोष मुक्त करणे मला न्यायोचित वाटते. सबब, त्याबाबतचे आदेश पारित करणे योग्य होईल. म्हणून, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

**आदेश**

१. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) नुसार दंडनिय अपराधातून निर्दोष ठरवून मुक्त करण्यांत येते.

२. आरोपीचे जामीनपत्र रद्द करुन जामीनदाराला मुक्त करण्यांत येते.

३. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी रूपये ४५,०००/– चा जामीन दाखल करावा.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४५२ नुसार असे आदेशित करण्यात येते की, अपिल कालावधीनंतर यातील जप्त असलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट राज्य उत्पादन शुल्क विभाग गडचिरोली यांनी लावावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.03.27 17:48:21 +0530

**(एस.एम.एच.शाहिद)**

दि.२७.०३.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी